

सकल मराठा समाजाच्या वतीने लग्नव्यवस्थेसंदर्भात बैठक संपन्न

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in सोमवार दिनांक 02/06/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 120 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# जग स्तिमित होईल, असाच कुंभमेळा होणार

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नाशिक कुंभमेळा सुरक्षित, निर्मळ आणि पवित्र वातावरणात होण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी निधीची उपलब्धता करून देण्यात येईल.

कुंभमेळा भारतीय सनातन संस्कृतीचे प्रतीक असल्याने संपूर्ण जगाचे लक्ष याकडे आहे. त्यामुळे सर्वांच्या सहकार्याने जग स्तिमित होईल असे भव्य दिव्य आणि स्मरणीय आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्यातील अमृत स्नानाचे दिवसही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सिंहस्थ कुंभमेळा पूर्वतयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार सीमा हिरे, आमदार राहुल ढिकले, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. साधू-महंतांच्या उपस्थितीत कुंभमेळ्याच्या तारखांची घोषणा होणे ही खऱ्या अर्थाने कुंभपर्वाची सुरूवात आहे, असे नमूद करू मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, कुंभमेळ्याचे संचलन आखाडे, साधू -महंत करतात, राज्य शासन सेवक म्हणून अधिकाधिक चांगली सुविधा देण्याचा प्रयत्न करते. यावेळी देखील शासनातर्फे उत्तम सुविधा उभारण्यात येतील. कुंभमेळ्याबाबत साधू महंतांचा अनुभव मोठा आहे, त्यामुळे त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल. २०१५ मध्ये तयारीसाठी कालावधी कमी होता. यावेळी पूर्व तयारीसाठी अधिक कालावधी असल्याने शासन चांगली तयारी करीत आहे. गोदावरी निर्मळ राहावी आणि कायम प्रवाही राहावी हेच कुंभचे उद्दिष्ट असून तसा शासनाचा प्रयत्न आहे. गोदावरीचे पावित्र्य अबाधित राखण्यासाठी उपायोजना करण्यात येत आहेत. गोदावरीत जाणारे पाणी स्वच्छ असावे याद्दष्टीने सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी निविदा काढण्यात येत आहेत. नदी पात्रात अशुद्ध पाणी जाऊ नये असे प्रयत्न करण्यात येतील. नदी प्रवाहित राहिल्यास शुद्ध राहील, त्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे कुंभ आणि त्यानंतरही गोदावरीचे जल निर्मळ राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# शेती ही संस्कृती, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेचा आधार

## - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. राज्य शासनाचा कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि कृषी महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सिंचन नगर मैदान, कृषी महाविद्यालय येथे आयोजित पुणे ॲग्री हॅकॅथॉन कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाला कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, आमदार बाबाजी काळे, आमदार बापूसाहेब पठारे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, प्र. विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे महासंचालक प्रशांत गिरबाणे, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू




डॉ. राजाराम देशमुख, माजी कृषी आयुक्त डॉ. उमाकांत दांगट, दापोली कृषी विद्यापीठाचे डॉ. संजय सावंत, बँक ऑफ महाराष्ट्रचे उपमहाव्यवस्थापक संजय वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.पवार म्हणाले, शेती फक्त शेतकऱ्यांची जबाबदारी नसून उद्योग, शास्त्रज्ञ, शासन आणि समाज यांचे संयुक्त उत्तरदायित्व आहे. शासनामार्फत ॲग्री स्टॅक, डिजिटल क्रॉप सर्व्हे, स्मार्ट सिंचन, कृषी डेटा मिशन, एफ.पी.सी. सक्षमीकरण आणि सेंद्रिय शेती प्रोत्साहन यांसारखे अनेक उपक्रम राबवित आहोत. शेतीमधून शाश्वत उपजीविका निर्माण करणे हा शासनाचा प्रमुख उद्देश असून, आत्मनिर्भर महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्याच्या कृषी क्षेत्राच्या प्रगतीची गती वाढविण्यासाठी आपण किती समर्पण भावनेनं काम करतो यावर महाराष्ट्राच्या कृषी विभागाचं भविष्य अवलंबून आहे, असे ते म्हणाले. राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी ॲग्री स्टॅक नावाची योजना सुरू केली आहे.

या योजनेत प्रत्येक शेतकऱ्याला एक युनिक फॉर्मर आयडी (Unique Farmer ID) दिला जात आहे. हा नंबर म्हणजे शेतकऱ्याची ओळख - जशी आपली आधारकार्डवर ओळख असते, तशीच ही शेतीसाठी खास ओळख असेल.

या नंबरद्वारे शेतकऱ्याची जमीन, घेतलेली पिके, मिळालेली अनुदानं, विमा, कर्ज याची सर्व माहिती जोडली जाईल. त्यामुळे भविष्यात कुठलीही योजना मिळवण्यासाठी वारंवार कागदपत्रं देण्याची गरज भासणार नाही.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 02/06/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : छळामुळे विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हडपसर भागात घडली. विवाहितेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी फुरसुंगी पोलिसांकडून पती, सासू, सासरे, दिरासह नातेवाइकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.**



प्रतीक्षा अभिषेक खळदकर (वय २७) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी पती अभिषेक आनंद खळदकर, सासरे आनंद, सासू सविता, दीर चेतन, नणंद वैभवी (सर्व रा. धनकवडी), तसेच निर्मला आवटे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत प्रतीक्षाची आई उषा राजेंद्र हरपळे (वय ४३, रा. हरपळे आळी, फुरसुंगी, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रतीक्षाचा ११ जून २०२० रोजी अभिषेक खळदकर याच्याशी विवाह झाला होता. हुंड्यात प्रतीक्षाला सात तोळे सोन्याचे दागिने देऊन विवाहाचा खर्चही हरपळे कुटुंबीयांनी केला होता. सासरी नांदत असताना प्रतीक्षाला वेळोवेळी टोमणे मारून तिचा छळ करण्यात आला. छळामुळे ती माहेरी निघून आली. तिने राहत्या घरात गळफास घेऊन ६ एप्रिल रोजी आत्महत्या केली. प्रतीक्षाचा छळ केल्याने तिने आत्महत्या केली, प्रतीक्षाचा छळ केल्याने तिने आत्महत्या केली, अशी फिर्याद तिची आई उषा हरपळे यांनी नुकतीच दिली.त्यानंतर पोलिसांनी विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

# पीएमपीतील प्रवासी महिलांकडील दागिने चोरणारा गजाआड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : पीएमपीतील प्रवासी महिलांकडील दागिने चोरणाऱ्या चोरट्याला येरवडा पोलिसांनी अटक केली. चोरट्याकडून एक लाख २५ हजारांची सोनसाखळी जप्त करण्यात आली.सुशांत शंकर गायकवाड (वय २४, रा. साईनाथनगर, खराडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. गेल्या काही दिवसांपासून पीएमपी प्रवासी महिलांकडील दागिने चोरून नेण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.पीएमपी बसमध्ये चोरी करणाऱ्या चोरट्यांना पकडण्याच्या सूचना पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे यांनी दिल्या होत्या.




पीएमपी प्रवासी महिलेच्या गळ्यातील चोरलेली सोनसाखळी विक्री करण्यासाठी गायकवाड येरवडा बाजारातील सराफी पेढीत येणार असल्याची माहिती पोलीस कर्मचारी विजय अडकमोल आणि नटराज सुतार यांना खबऱ्याने दिली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून गायकवाडला पकडले.

त्याच्याकडून सोनसाखळी जप्त करण्यात आली.

येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्रकुमार शेळके, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर, विजय ठाकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक रतिकांत नंदनवार, उपनिरीक्षक प्रदीप सुर्वे, तुषार खराडे, किरण घुटे, सागर जगदाळे, सचिन गवळी, महेंद्र शिंदे यांनी ही कामगिरी केली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 02/06/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# अकरावीसाठी इनहाउस कोट्याअंतर्गत पूर्वीप्रमाणेच प्रवेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : अकरावीसाठी इन हाउस (संस्थांतर्गत) कोट्यातील जागांबाबत करण्यात आलेला नियमबदल मागे घेण्यात आला आहे. पूर्वीच्याच पद्धतीने प्रवेश देण्याचे निर्देश शिक्षण विभागाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांना दिले आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थी, पालक, संस्थाचालकांना दिलासा मिळणार आहे.




अकरावी ऑनलाइन प्रवेश नियंत्रण समितीचे अध्यक्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. त्यानुसार, प्रसिद्धीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, 'मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे हा भाग सोडून राज्यातील इतर भागांसाठी एकाच संस्थेच्या शाळा व उच्च माध्यमिक विद्यालयासाठी १० टक्के इन-हाउस कोट्यासाठी महसुली जिल्हा हे युनिट असेल. एकाच संस्थेच्या जिल्हांतर्गत असणाऱ्या सर्व शाळांकरिता व उच्च माध्यमिक शाखांकरिता इन-हाउस कोटा लागू असेल.'म्हणजे, पुणे जिल्ह्यातील एखाद्या शाळेतून दहावी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी, त्याच्या शाळेच्या पालक संस्थेच्या पुणे जिल्ह्यातील कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात इन-हाउस कोट्यांतर्गत अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र असेल.

'एकाच संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गाच्या शाळा वेगवेगळ्या ठिकाणी असतील, तर अशा संस्थांमधील इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेशांसाठी इन-हाउस कोटा १० टक्के असेल,' असे यात नमूद केले असून, त्यासाठी कार्यक्षेत्रही निश्चित करण्यात आले आहे.

# मध्यप्रदेशमधून पिस्तुलांची तस्करी ; 5 पिस्तुल 20 जिवंत काडतुसे जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील मालमत्ता विरोधी पथकाने पिस्तूल विक्री आणि दहशत पसरविण्यासाठी पिस्तुलाचा वापर करणाऱ्या तिघांना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपींकडून पाच पिस्तुल आणि वीस जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. तीन ही आरोपी हे सराईत गुन्हेगार असून एकावर हत्येचा गुन्हा दाखल आहे. उमेश चंद्रकांत केदारी, मंथन उर्फ गुड्डू अशोक सातकर आणि विशाल ज्योतिराम खानेकर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस शिपाई गणेश सावंत, सुमित देवकर आणि विनोद वीर यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली. तळेगाव दाभाडे परिसरात तीन अज्ञात व्यक्ती चार चाकी गाडीतून फिरत आहेत. त्याच्या जवळ पिस्तुल आहे. मालमत्ता विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक विजय ढमाल यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित पथकाने अज्ञात व्यक्तींना ताब्यात घेतलं.उमेश चंद्रकांत केदारी, मंथन उर्फ गुड्डू अशोक सातकर आणि विशाल ज्योतिराम खानेकर यांना ताब्यात घेतलं.त्यांच्याकडे ८ लाख ५६ हजारांची ५ पिस्तुले आणि २० जिवंत काडतुसे जप्त केले आहेत. याप्रकरणी तळेगाव पोलीस ठाण्यात आर्म ऍक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहशत माजवण्याकरिता आणि तीन पिस्तुल विक्रीसाठी ठेवण्यात आली होती. हे पिस्तुल मध्यप्रदेशमधील बर्नाळा येथून आणल्याच समोर आलं आहे. उमेश केदारी याच्यावर हत्येच्या गुन्ह्यासह चार गुन्हे दाखल आहेत.मंथन याच्यावर हत्येचा प्रयत्न या गुन्ह्यासह एकूण तीन तर विशाल खानेकर याच्यावर दोन गुन्हे दाखल आहेत. ही कामगिरी पोलीस उपायुक्त गुन्हे संदीप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त 300 रोपांचे वाटप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड : येथील आघाडीची सामाजिक संस्था असलेल्या उन्नती सोशल फाऊंडेशन तर्फे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती पर्यावरण पूरक पद्धतीने साजरी करण्यात आली. विविध प्रजातीच्या ३०० रोपांचे नागरिकांना वाटप करत , पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.**



या उपक्रमामागील संकल्पना विशद करताना उन्नती सोशल फाऊंडेशन च्या अध्यक्षा डॉ.कुंदाताई संजय भिसे म्हणाल्या ,"राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य म्हणजे केवळ राजकीय किंवा सामाजिक नाही, तर पर्यावरणस्नेही शासक म्हणूनही त्यांचा ठसा इतिहासावर आहे. १७व्या-१८व्या शतकात शासन करत असताना त्यांनी नदी व जलस्रोतांचे संवर्धन, वृक्ष लागवड, आणि संधारण आधारित विकास या गोष्टींवर विशेष भर दिला.नद्यांची शुद्धता आणि महत्त्व ओळखून त्यांनी गंगा, नर्मदा, यमुना यांसारख्या प्रमुख नद्यांच्या तीरावर घाट, मंदिरे आणि यात्रेसाठी सुरक्षित व स्वच्छ जागा उभारल्या. यामागे केवळ धार्मिक नाही, तर पर्यावरणीय दृष्टिकोनही होता.त्यांच्या कार्यकाळात तलाव, विहिरी, घाट व बंधाऱ्यांचे निर्माण मोठ्या प्रमाणावर करण्यात आले, जे आजही अनेक भागांत कार्यरत आहेत. पाण्याचा शाश्वत वापर हा त्यांचा व्यवस्थापनाचा केंद्रबिंदू होता. आज रोपवाटप करून उन्नती सोशल फाऊंडेशन द्वारे एक प्रकारे वरूणराजाला साकडे घालण्यात आलेले आहे."

उपक्रमाला शुभेच्छा देताना , भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले , "राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती निमित्ताने उन्नती सोशल फाऊंडेशन यांनी सामाजिक बांधिलकी जपत रोपवाटपाचा सुंदर उपक्रम राबवला, हे पाहून मनाला अत्यंत समाधान आणि अभिमान वाटतो.अहिल्यादेवी होळकर या केवळ एक महान स्त्री शासक नव्हत्या, तर त्या पर्यावरणप्रेमी, समाज हितदक्ष आणि धर्मशील विचारसरणीच्या प्रतीक होत्या. त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून, आजच्या युगात पर्यावरण रक्षणासाठी उचललेले हे पाऊल खरोखरच प्रेरणादायी आहे.झाडं लावणं ही भविष्यासाठीची शाश्वत गुंतवणूक आहे आणि उन्नती सोशल फाऊंडेशनने हे योग्य प्रकारे समजून आजचा दिवस अर्थपूर्ण केला आहे. या सामाजिक उपक्रमात सहभागी सर्व कार्यकर्ते, संयोजक आणि उपस्थितांचे मनःपूर्वक अभिनंदन.!"

याप्रसंगी , उन्नती सोशल फाऊंडेशन चे संस्थापक संजय तात्याबा भिसे , अध्यक्षा डॉ.कुंदाताई संजय भिसे , भारतीय जनता पार्टीचे पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष शत्रुघ्न बाप्पू काटे यांच्यासह विठाई वाचनालय चे सभासद , आनंद हास्य क्लब चे सभासद , ऑल सिनियर सिटीजन्स असोसिएशन चे सर्व सभासद तरुण वर्ग आणि पिंपळे सौदागर परिसरातील देशप्रेमी नागरिक बंधू-भगिनी आदी उपस्थित होते.

# सकल मराठा समाजाच्या वतीने लग्नव्यवस्थेसंदर्भात बैठक संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड ; शहरातील सकल मराठा समाजाच्या वतीने रविवार दि. १ जून २०२५ रोजी. सकाळी ११.३० वा. आरंभ बँक्वेट, बी.आर.टी.रोड, काळेवाडी, पुणे – १७ येथे महत्वाच्या सामाजिक विषयांवर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. नुकतीच आपल्या शहरातील कन्या वैष्णवी हगवणे - कस्पटे हिच्या बाबतीत जी दुर्घटना घडली त्या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यातच नव्हे तर देशभर पडले आहेत. या घटनेमुळे मराठा समाजाबद्दल उलट सुलट चर्चा सुरु आहेत. त्यामुळे पुणे शहरातील सकल मराठा समाजाने लग्नव्यवस्थेसंदर्भात एकत्र बैठक घेऊन काही अटी व नियम लागू केलेले आहेत.



याच धर्तीवर आपल्या पिंपरी चिंचवड शहर सकल मराठा समाजाच्या धोरणात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

कै. वैष्णवीस श्रद्धांजली अर्पण करून सदर बैठकीस सुरुवात करण्यात आली. या बैठकीत समाजाची भविष्यातील वाटचाल व त्यासंदर्भात काही नियम व धोरणे निर्धारीत करण्यात आली आहेत. लग्न व्यवस्था व इतर कार्यक्रम व समारंभ याबाबतीत आचारसंहिता घालून देण्यात आलेली आहे. सर्व समाज बांधवांनी या आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन या बैठकीत करण्यात आले.

यावेळी पिंपरी चिंचवड शहरातील मोठ्या प्रमाणात मराठा समाज बांधव व इतर समाजबांधवही उपस्थित होते. हा विषय फक्त मराठा समाजापुरता मर्यादित नसल्याने इतर समाज बांधवांनाही बैठकीस उपस्थित राहण्यासाठी आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी बऱ्याच उपस्थितांकडून वेगवेगळ्या सूचना करण्यात आल्या सदर सूचनांचा समावेश आचारसंहितेत करण्यात येणार आहे.

सभेचे प्रास्ताविक भाऊसाहेब भोईर यांनी केले व सभा घेण्यामागील उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन श्री नाना शिवले यांनी तर प्रशांत शितोळे यांनी आचारसंहितेचे वाचन करून आभार मानले.

यावेळी मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप, विलास लांडे, संजोग वाघेरे पाटील, सुरेश भोईर, नाना काटे, मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक, राजेंद्र कोंढरे, महाराष्ट्र राज्य कुंभार समाजाचे प्रमुख सतीश दरेकर, भानुप्रताप बर्गे साहेब, राजेंद्र कुंजीर, पुणे शहर समन्वयक सचिन आडेकर, मराठा महासंघ संपर्कप्रमुख अनिल तागडे, हा कोंडे सचिन, सचिन साठे, अतुल शितोळे, एन बी भोंडवे, मधुकर मास्तर चिंचवडे, धोंडीबा भोंडवे इत्यादी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले व समाजाची पुढील दिशा ठरविण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968